MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2021 - Impact Factor: 6.91

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 6, Vol.I, Special Issue-XXXI, 5 June 2021



# पर्यावरण आणि मानव विकास

**Editor : Dr. Dharampurikar Bhalchandra Vaijanathrao**

**Address for Correspondence**

***Mrs. Pallavi Laxman Shete***

Editor in Chief : Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Reffered)
Principal, Sanskriti Public School, Nanded (MH, India) Email : shrishprakashan2009@gmail.com

***Dr. Rajesh G. Umbarkar***

House No. 624 - Belanagar, Near Maruti Temple, Taroda (Kh.) Nanded - 431605 (India - Maharashtra)
Email - umbarkar.rajesh@yahoo.com, shrishprakashan2009@gmail.com Mob. No. 9623979067
Director : Mr. Tejas Rampurkar (For International Contacts only + 91-8857894082)

**(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)**

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 34. | संत साहित्यातील पर्यावरण | डॉ. विठ्ठल केदारी | 183 |
| 35. | संत साहित्यातील पर्यावरण | शारदा किशन धामणगावकर | 187 |
| 36. | पर्यावरणाचा समतोल आणि आदिवासी समुदाय : एक समाजशास्त्रीय अभ्यास | प्रा. डॉ. संजय सुरेवाड | 190 |
| 37. | संत वाङ्मयातील कृषिनिष्ठ जाणिवांचा शोध आणि बोध | डॉ. राजीव यशवंते | 194 |
| 38. | आधुनिक शेती व त्याचा पर्यावरणावर होणारा परिणाम | कविता किसन भोये | 202 |
| 39. | माध्यमे आणि पर्यावरण | प्रा.डॉ. कांचन मुळे | 205 |
| 40. | पर्यावरण आणि राजकारण | प्रा. भोये सुरेश मुरलीधर | 211 |
| 41. | पर्यावरणीय समस्या वास्तव आणि राजकारण | डॉ. मारोती तुकाराम घंटेवाड | 215 |
| 42. | **पर्यावरण व आर्थिक विकास** | **डॉ. महेंद्र पांडुरंग पवार** | 220 |
| 43. | पर्यावरण संरक्षण, संवर्धनाबाबत जनजागृतीची आवश्यकता | डॉ. सविता शिवनाथ झुंजारे | 222 |
| 44. | भाषा अध्यापनातून पर्यावरण शिक्षण | प्रा.डॉ.लक्ष्मीविष्णू भंडारे | 226 |
| 45. | लोकसंख्या आणि पर्यावरण | डॉ.अशोक भाऊराव माळशिखरे | 233 |
| 46. | "शाश्वतआर्थिक विकासासाठी पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता" | डॉ. ज्ञानेश्वर नामदेव सोनवणे | 239 |
| 47. | कृषि, शाश्वत विकास आणि पर्यावरण | श्री. राहुल सुखदेव पोखरकर | 247 |
| 48. | **मानव विकास निर्देशांकातील आरोग्य संवर्धनासाठी यज्ञातून पर्यावरणाकडे वाटचाल** | **डॉ. राजेश गं. उंबरकर** | 252 |
| 49. | **लोकसंख्या आणि पर्यावरण** | **प्रा. डॉ. लक्ष्मण शिराळे** | 263 |
| 50. | जैवविविधतेची संकल्पना आणि महत्त्व | श्री.विनायक दशरथ नाकतोडे | 271 |
| 51. | पर्यावरणवाद आणि आंतरराष्ट्रीय राजकारण | डॉ. किशोर बी. वासनिक | 274 |





Scanned with OKEN Scanner

Worldwide International Inter Disciplinary Research Journal (A Peer Reviewed Referred) ISSN – 2454 - 7905

# “शाश्वतआर्थिक विकासासाठी पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता”

डॉ. ज्ञानेश्वर नामदेव सोनवणे

सहाय्यक प्राध्यापक, कर्मवीर भाऊसाहेब हिरे, कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,निमगाव,ता.-मालेगाव,जि.-नाशिक

**गोषवारा:**

भावी पिढीच्या गरजा पूर्ण करण्याची पर्यावरणीय क्षमता कायम ठेवून पर्यावरणाचा ऱ्हास न करता वर्तमान पिढीच्या सर्व गरज पूर्ण करणारा विकास म्हणजे शाश्वत विकास (जागतिक पर्यावरण आणि विकास आयोग) (१). पर्यावरणाचा आणि मानवाच्या आर्थिक विकासाचा अतूट संबंध असल्याने पर्यावरण संवर्धन हा शाश्वत विकासाचा आधार स्तंभ ठरतो. पर्यावरण सवर्धना शिवाय शाश्वत आर्थिक विकास केवळ अशक्य असतो. परंतु जीडीपी वाढीशी संबंधित आर्थिक विकास साध्य करण्यासाठी नैसर्गिक साधनांचे अतिरिक्त दोहन होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. जीडीपी वाढीस प्रमुख आणि पर्यावरणास दुय्यम स्थान दिल्यामुळे संपुर्ण इकोसिस्टिमला धोका पोहोचून जागतिक तापमान वाढ, समुद्रजल पातळीत वाढ, चक्रीवादळे, पूर. दुष्काळ, ओझोन क्षय, आम्लपर्जन्य यासारख्या आपत्ती निर्माण होऊन पर्यावरणावर आधारित कृषिप्रधान अर्थव्यवस्थेतील आर्थिक विकास बाधित आणि खंडित होत आहे. अलीकडील काळात पर्यावरणाचा ऱ्हास करून केवळ तात्पुरता अथवा वर्तमान पिढीचा विचार करून साध्य केलेला विकास हा अशाश्वत असतो आणि पर्यावरण सवर्धना शिवाय शाश्वत विकास केवळ अशक्य आहे हे लक्षात आल्यामुळे शाश्वत आर्थिक विकास साध्य करण्याचे उद्दिष्टे सर्व देशांमध्ये स्वीकारण्यात आलेले आहे. विकास ही निरंतर चालणारी प्रक्रिया असताना त्यात विकासाचे सातत्य कायम अथवा शाश्वत ठेवणे हे एक मोठे आव्हान ठरलेले आहे. यास्तव भविष्यकालीन चिरस्थायी आर्थिक विकासासाठी पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता निर्माण झालेली आहे.

सूचकशब्द (**Keywords**): नैसर्गिकसंसाधने, पर्यावरणसंवर्धन, आर्थिकविकास,शाश्वतविकास,

## प्रस्तावना(Introduction):

विकास ही सतत चालणारी प्रक्रिया असून विकासाचे आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, विकास असे अनेक पैलू आहेत. त्यापैकी आर्थिक विकासा तवास्तव सकल उत्पादनात वाढ अथवा दरडोई उतपन्नतील दीर्घ कालीन वृद्धी मोजली जाते (२). एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून सर्वच अर्थव्यवस्थांमध्ये जलद आर्थिक विकास घडवून आणण्याचे उद्दिष्टे स्वीकारून जलद आर्थिक विकासासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा अधिकाधिंक वापर करण्याचे प्रारूप स्वीकाण्यात आले. त्यामुळे एका बाजूला

जीडीपी मध्ये वाढ घडवून आली परंतु दुसऱ्या बाजूला ऐषआरामी जीवन पद्धती, अतिरेकी भौतिक उपभोग यामुळे साधनांच्या अतिरेकी व अविवेकी वापरातून पर्यावरणाचा ऱ्हास सुद्धा पदरीपडला. कारखाने, वाहने, हरितगृहे, इलेक्ट्रॉनिक व प्लास्टिक साधनांचा वाढता वापर, रासायनिक शेती, अपारंपरिक खनिजे, शस्त्रस्पर्धा यातील वाढीमुळे हवा, पाणी, भूमी यासारखे पंचमहाभूते प्रदूषित झाली. भूगर्भातील पाण्याची पातळी खालावत आहे, समुद्राच्या पाण्याची पातळी वाढत आहे, प्लास्टिकच्या कचऱ्याने संपूर्ण इकोसिस्ट मगाळाने बंद आहे, कचऱ्याचे ढिगारे शहराच्या क्षितिजापर्यंत पोहोचले आहे. पर्यावरण या अधोगतीची चिन्हे दर्शवित आहे. पूर, दुष्काळ, चक्रीवादळ, ऋतुबद्ल, जागतिक तापमानात वाढ, जमिनीच्या उत्पादकतेतील घटयासर्वांचे आर्थिक विकासावर परिणाम होत असून आर्थिक विकास हा चिरस्थायी ठरणार नाही अशी चिन्हे दिसून येत आहेत (३) त्यामुळे विकासदाराच्या वाढीस प्राधान्य देणारे विकासाचे मॉडेल बदलून अलीकडील काळात सातत्यपूर्ण व चिरस्थायी आर्थिक विकासासाठी पर्यावरण सवर्धनातून शाश्वत विकास हे उद्दिष्ट स्वीकारणे क्रमप्राप्त बनलेले आहे. प्रस्तुत अध्ययनाद्वारे शाश्वत आर्थिक विकासासाठी पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता विषयक विषय मांडणी केली आहे.

**अध्ययनाची उद्दिष्टे:**

- शाश्वत विकासासाठी पर्यावरणसंवर्धनाचे अध्ययन करणे.
- शाश्वत विकासासाठी उपाययोजनांचे अध्ययन करणे.

**अध्ययनपद्धती:**

प्रस्तुत अध्ययनातसाठी दुय्यम सामुग्रीचा वापर केला असून यामध्ये संदर्भग्रंथ, मासिके,वेबपेजेस इत्यादींच्या माध्यमातून तथ्य संकलन करून मांडणी करण्यात आलेली आहे.

**शाश्वत विकास:**

पारंपारिक अर्थाने विकास म्हणजे आर्थिक सुबत्ता,= दागदागिने व सर्व सोयीसुविधा असणे होय .पण वैयक्तिक कौटुंबिक व सामाजिक सुबत्ताही इतर काही गोष्टींवर अवलंबून असते जे घटक उत्पन्नापेक्षा वेगळी असतात .शाश्वत विकास हा विकासापेक्षा अधिक व्यापक आहे. कमी कालावधीत झालेला विकास हा अधिक काळ टिकून राहत नाही तो अशाश्वतविकास ठरतो

शाश्वत विकास ही अर्थशास्त्रातील एक महत्त्वपूर्ण व विशेष प्रकारची संकल्पना असून एका बाजूला प्रत्यक्षपणे विकासाच्या अर्थशास्त्राशी संबंधित आहे तरदुसरया बाजूला पर्यावरणाचा अंतर्गत भाग असते.शाश्वत विकासास चिरंतन, चिरस्थायी, धारणक्षमत विकास म्हणूनसुद्धा संबोधले जाते .

शाश्वत म्हणजे कधीही न संपणारा, नष्ट न होणारा, चिरकाल टिकणारा (विकिपीडिया)

शाश्वत विकास म्हणजे चिरंतनअथवा चिरकाल टिकणारा विकास( ब्रुंड्टलँड अहवाल-१९८६).



Scanned with OKEN Scanner

**शाश्वत विकास : व्याख्या**

1. जो विकास चालू पिढीच्या गरजा पुढीलपिढीच्या गरजा धोक्यात न आणता पूर्ण करतो त्या विकासाला शाश्वत विकास असे म्हणतात.(पर्यावरण आणि विकास जागतिक ब्रुंण्डलँड आयोग: १९८७)
2. शाश्वत विकास म्हणजे असा विकास कीजो मानवी गरजा व समाधान चिरकाल टिकविणारा आणि मानवी जीवनाचा दर्जा सुधारणारा असतो .( रॉबर्ट ॲलन).
3. निसर्गाच्या व्यवस्तेपासून प्राप्त केलेल्या वस्तू व सेवा विषयक अर्थव्यवस्थेची उत्पादन शक्यतेची तजवीज करून चालू ठेवणे म्हणजे शाश्वत विकास होय (के. पारीख).(४).
4. वर्तमानकालीन गरजांची पूर्तता करत असतानाच्या प्रयत्नांचा परिणाम भविष्यकालीन गरजांवर होणार नाही ही बाब विचारात घेऊन साध्य केलेला विकास म्हणजेच शाश्वत विकास होय.

   थोडक्यात पर्यावरणाची महत्ता फगघ टिकवून ठेवणारा विकास म्हणजे शाश्वत विकास होय.

**शाश्वत विकास संकल्पनेचा उगम**

१९७२ मध्ये युनोच्या स्टॉकहोम परिषदेत मानवी कुटुंबांचे आरोग्य व उत्पादक पर्यावरणासाठी असणारे हक्क ठरविण्याबाबत राष्ट्रांमध्ये एकमत झाले.१९८०मध्ये आययूसीएन ने प्रसिद्ध केलेल्या डब्ल्यू सीईएसमध्ये पर्यावरण संवर्धन व विकास यामधील परस्परावलंबन अधोरेखित करण्यात आले.१९८२मध्ये वर्ल्ड चार्टर ऑफ नेचर चा स्वीकार करण्यात आला .१९८७ मध्ये जागतिक पर्यावरण व विकास आयोगाची स्थापना करण्यात आली.या आयोगाने अवर कॉमन फ्युचर या अहवालात शाश्वत विकास संकल्पना व शाश्वत विकासाची व्याख्या सर्वप्रथम मांडली. हा आयोग पृथ्वीवरील सामाजिक पर्यावरणीय समस्यांचे निवारण करून त्यावर वास्तववादी उपाययोजनांसाठी आणि पृथ्वीवरील संसाधने पुढील पिढ्यांसाठी राखून त्यांचा उपयोग शाश्वतरित्या कसा करता येईल यासाठी उपाययोजना शोधण्यासाठी नेमण्यात आला होता. या आयोगाचे अध्यक्ष नॉर्वे चे पंतप्रधानग्रोहारलेमब्रुंण्डलँड या होत्या. त्यावरून या आयोगाला ब्रुंण्डलँड असे म्हणतात.(५).

**शाश्वत आर्थिक विकासाची उद्दिष्टे :**

२०१२ मध्ये रिओ +२०या परिषदेत शाश्वत विकासाचे उद्दिष्ट ठरविण्यात येऊन सप्टेंबर २०१५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेत सर्व देशांच्या प्रमुखांनी मान्यता दिली.मानवी आयुष्याच्या सर्व अंगांचा विचार करून तसेच पृथ्वीवरील विविध प्राणिमात्र आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व लक्षात घेऊन पाच प्रमुख प्रकारच्या उद्दिष्टांची रचना करण्यात आली आहे(६).

1.मानवी विकास विषयक उद्दिष्टे

- २०३० पर्यंत गरिबीचे प्रमाण पंचेचाळीस टक्क्यांपर्यंत कमी करणे ० दूर करणे
- २०५०पर्यंत दारिद्र्य पूर्णपणे संपविणे
- जगातील एक व्यक्ती भूकंपग्रस्त असणार नाही अशी व्यवस्था करणे
- सर्वांना उत्तम आरोग्य सुविधा प्रदान करणे
- सर्व प्रकारची विषमता दूर करणे
- सर्वांना शुद्ध पेयजल उपलब्ध करून देणे

2..पृथ्वी रक्षण विषयक उद्दिष्टे:

- हवामान बदलाचे परिणाम कमी करणे
- जमीन व पाण्यातील जीवनाचे रक्षण करणे
- स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढविणे
- मानवी उपभोगात संयम आणणे

3.समृद्धीसाठी विषयक उद्दिष्टे:

- ऊर्जेचाशाश्वत पुरवठाकरणे
- आर्थिक विकासाच्या जोडीला सर्वांना सन्मानजनक रोजगार पुरविणे
- उद्योगामध्ये शाश्वत रोजगाराचा वापर वाढविणे
- पर्यावरणाची हानी न होता समाजाच्या पायाभूत गरजा पूर्ण करणे 4

4.शांतता व न्यायविषयक उद्दिष्टे

- संस्थात्मक रचना निर्माण करणे
- विकासाचा दर्जा सुधारणे
- तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे
- संसाधनांचे संरक्षण आणि संवर्धन .
- निर्णय प्रक्रियेमध्ये पर्यावरण व अर्थशास्त्राचा समावेश करणे.

5.जागतिक भागीदारी वाढविणे विषयक उद्दिष्टे :

- वैज्ञानिक व तांत्रिक आदानप्रदानासाठी, आर्थिक मदतीच्या सतत पुरवठ्यासाठी ,व्यापारासाठी विकसनशील देशांचा वाटा वाढविणे

**शाश्वत आर्थिक विकास व पर्यावरण संवर्धन :**

ॲडम स्मिथ यांच्या मते मानवाला कोणत्या ना कोणत्या प्रकारे उपयोगी पडणारे पर्यावरणीय घटक म्हणजे साधन संपदाहोय .जमीन,जंगल, प्राणी- पशू, जैवविविधता ,खनिजे, हवा, पाणी, समुद्रकिनारे ,डोंगर- दऱ्या,पारंपरिक ऊर्जा या नैसर्गिक साधनसंपत्तीवर देशाचा आर्थिक विकास अवलंबून असतो.आर्थिक विकास करताना या साधनसामुग्रीच्या वापराचे व्यवस्थापन असणे आवश्यक असते.नैसर्गिक



Scanned with OKEN Scanner

साधनसंपत्तीच्या योग्य वापरातून दीर्घकाळ अर्थात चिरकाल, चिरस्थायी आर्थिक विकास साध्य करून घेता येतो.अशा चिरस्थायी विकासाचा वर्तमान पिढीबरोबर भविष्यातील पिढीच्या गरजा भागविण्यासाठी सुद्धा उपयोग करून घेता येतो.

मानव व पर्यावरण यांचा परस्पर संबंध अतूट आहे. मानवाच्या सभोवताली असणार्या व त्यांच्यावर प्रभाव टाकणार्या प्राकृतिक व जैविक घटकांची पूर्ण मालिकाम्हणजे पर्यावरण होय (ब्रिटानिका ज्ञानकोश )(६).स्वतःचा किंवा समाजाचा विकास करताना जर निसर्गाला धक्का पोहोचत असेल तर असा विकास अशाश्वत विकासहोय. कारण यातून पर्यावरणीय असंतुलन होऊन मानव स्वत साठी अस्थिरता निर्माण करून घेईल हा शाश्वत विकास नव्हे.

मानव आणि त्याच्या सभोवतालच्या पर्यावरणाचे एकात्मीकरण असते, म्हणजे एकाचे कल्याणहे दुसर्यावर अवलंबून असते. उत्पन्न आणि आर्थिक विकासाच्या गतीशिवाय पर्यावरणाचे संरक्षण होऊ शकणार नाहीहे खरे असले तरी पर्यावरण संरक्षणाविना हळूहळूआर्थिक विकास क्षीण होईल.त्यामुळे मानवी जातीला पर्यावरणीय अवनतीपासून होणारा धोका हा आण्विक धोक्यासारखाच मोठा असणारआहे .म्हणून औद्योगिकरण किंवा विकास कोणीही थांबवू शकणार नाही.त्यासाठी चिरस्थायी विकास हा मध्यम मार्ग असून त्यातूनच आर्थिक शाश्वतता निर्माण होईल.मात्र त्यासाठी पिण्याचे पाणी, आरोग्य, स्वच्छता, ऊर्जा, अन्नसुरक्षा, जैवविविधता, लोकसंख्या, औद्योगिक तंत्रज्ञान या मूलभूत बाबींची जोड देणे महत्त्वाचे आहे.

पर्यावरणाला प्रदूषण व अतिरिक्त दोहन यापासून वाचवण्याच्या प्रक्रियेला पर्यावरण संवर्धन म्हटले जाते . शाश्वत आर्थिक विकासासाठी पर्यावरणाचे संवर्धन महत्त्वपूर्ण ठरते कारण पर्यावरणाचा उत्पादन ,उपभोग, विनिमय, वितरण,बाजारपेठा , व्यापार इ.सारख्या आर्थिक घटकांवर परिणाम होत असतो.म्हणून शाश्वत विकासासाठी जगातील इतर देशांच्या बरोबरीने भारतात पर्यावरण संरक्षणासाठी अनेक प्रकारचे प्रयत्न करण्यात आलेले आहेत

भारतात सर्वसमावेशक पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा कायदा आवश्यकहोता. १९७२मधील मानवी पर्यावरण जागतिक परिषदेचा संदर्भ घेऊन भारतीय राज्यघटनेच्या२५३ कलम वर आधारित १९८६मध्ये करण्यात आला तेव्हापासून पर्यावरण संरक्षणाबाबत विविध कायदे करण्यात आले. त्या अगोदरचे कायदे हे विशिष्ट घटकांशी संबंधित होते . त्यानंतर पर्यावरण संवर्धनासाठी विविध नियमातून पर्यावरणाचे उल्लंघनन करणारे नवे कायदे करण्यात आलेव शाश्वत विकास घडविण्याचा घडवण्याचा प्रयत्न केला. कारण पर्यावरणाचा र्हासम्हणजेचसजीवांच्या र्हासाची नांदीआहे . आपला आसमंत निकोप राखून विकासात कोणतीेरही तडजोड न करता होणार आहे. वर्तमानकालीन, भविष्यकालीन जीवन



Scanned with OKEN Scanner

सुखकर होणार आहे. आर्थिक विकास करताना पर्यावरणाच्या रक्षणाची व शाश्वत विकासाची जबाबदारी प्रत्येक व्यक्तीची आहे.

१९९१मध्ये पर्यावरण दृष्टीने शाश्वत विकास करण्यासाठी वातावरणातील हवेची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी हवा प्रदुषण नियंत्रण कायदा अस्तित्वात आणला. १९८६मध्ये पर्यावरण संरक्षण कायदा-संयुक्त राष्ट्रपरिषदेत पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी भारत सरकारने पर्यावरण संरक्षण कायदा अस्तित्वात आणला.१९७४मध्ये पर्यावरण संरक्षण व सार्वजनिक आरोग्याच्यादृष्टीने भारत सरकारने जलप्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण कायदा केला.१९७२केंद्र सरकारने पर्यावरण आणि वन विभागाला वन्यजीव संरक्षण कायदा अधिकार प्रदान करण्यात आला. १९९२मध्ये रियो दी जानेरो (ब्राझील येथील वसुंधरा शिखर परिषदेमध्ये)अजेंडा २१ मान्य करण्यात आला. अजेंडा २१नुसार ब्रुंण्डलँड आयोगाने शाश्वत विकासासाठी सांगितलेल्या शिफारशींचा योग्य पाठपुरावा करण्यासाठी शाश्वत विकास आयोग(Commission on Sustainable Development) स्थापन करण्यात आला.हा आयोग संयुक्त राष्ट्राच्या पर्यावरण व शाश्वत विकासकामांचे समन्वय करतो.

१९९९मध्येच शाश्वत कृषी हे भारतामध्ये उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. कृषी विकास आराखडा मध्ये राष्ट्रीय शाश्वत विकास आणि ग्रामीण विकास आराखडा म्हणून स्वीकारण्यात आला. व पर्यावरण संवर्धन केले. अंतर्गत फुलशेती विकास, त्या त्या प्रदेशांना अनुकूल पिकांची शेती, पाणलोट क्षेत्रविकास, मृदा व जलसंवर्धन, कृषी संवर्धन, जैविक खते व तंत्रज्ञानाचा वापर, कृषी संशोधने, टाकाऊ वस्तूंची विल्हेवाट, पुनर्प्रक्रिया, गंगा शुद्धीकरण योजनाअशा अनेक प्रयत्न प्रदुषण नियंत्रितकरण्यासाठी केलेआहे.पर्यावरणीय कायद्यानुसार निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये जाणीव जागृती करून कायद्याची अंमलबजावणी होत आहे व पर्यावरण संरक्षण होत आहे.पर्यावरण संरक्षणासाठी वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे .

**शाश्वत आर्थिक विकासासाठी उपाययोजना :**

1. कारखान्यातून निघणारेदूषित पाणी पिऊन जलचर व उभयचर प्राण्यांचे मृत्यू होतात. दुसरी कडे त्याच प्रदूषित पाण्याला शेतात वापरले जाते. व दूषित पाण्यात उगवलेला भाजीपाला खाऊन आपले आरोग्य बिघडण्याचा धोका असतो.. पाणी प्रदूषणामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होते म्हणून कारखान्यातून आणि घरातून निघणारे दूषित पाणी व सांडपाणी नदी ,नाले व समुद्रात जाऊ नये याची व्यवस्था करणे.



Scanned with OKEN Scanner

2. मोठमोठ्या कारखान्यांच्या चिमण्यांमधून निघणारे धूर, रेल्वे व इतर पेट्रोल, डिझेल वर चालणारी वाहनांमधून निघणारा धूर वायु मंडळात मिसळून वातावरण प्रदूषित करतो.त्यातून मानवाच्या श्वसनावर आणि वस्तू व सेवांच्या गुणवत्तेवर परिणाम होतो म्हणून कारखान्याद्वारे हवेत मिसळणारा कार्बन डायऑक्साईड हाजिओ- इंजिनिअरींगच्या माध्यमातून जमिनीत खोलवर डम करावा किंवा पाण्यात विलीन करावा
3. आज लग्न तसेच इतर समारंभात मोठमोठ्या आवाजात गाणी वाजवली जातात. ज्यामुळे ध्वनी प्रदुषण होऊन बहिरेपणा व डोकेदुखी या समस्या निर्माण होतात.मानवासह सजीवाच्या वर्तनावर परिणाम होतो म्हणून ध्वनिप्रदुषण टाळण्यासाठी कडक नियम बनविणे आवश्यक आहे
4. लोकसंख्येचे कमी जन्मदर व कमी मृत्युदर अशा स्थिर स्थितीत लोकसंख्या संक्रमण होणे गरजेचे आहे.
5. अक्षय ऊर्जेवर अवलंबून राहून पारंपरिक ऊर्जा संक्रमण करणे.
6. संसाधनांचा वापर शाश्वत पद्धतीने करणे.
7. आर्थिक विकासाबरोबर पर्यावरणाचाही विचार करणारी अर्थव्यवस्था निर्माण करणे.
8. मनुष्य व निसर्ग यांना वेगवेगळे न ्रमानता त्यांचे परस्पर अवलंबित्व स्वीकारणारा दृष्टिकोन विकसित करणे.
9. सर्व सहभाग स्वीकारणारी व जागतिक तडजोडीचे प्रयत्न करणारी राजकीय व्यवस्थेची गरज निर्माण करणे.
10. निसर्गसंपत्तीचा योग्य वापर करून मानव व सजीवांचे अस्तित्व टिकविणे.
11. जंगलतोड करताना त्याच प्रमाणात जंगल लागवड करणे.
12. शेतीत रासायनिक खताऐवजी सेंद्रिय व नैसर्गिक खतांचा उपयोग करणे व जमीन पोषण क्षमता टिकविणे.
13. पर्यावरणाची काळजी आणि विकासाचे एकात्मीकरण करणे.
14. साधनसंपत्तीचे उपयोजन करणे.साधनसंपत्ती उपभोगात घट करणे, पुन्हा- पुन्हा वापर आणि पुनर्चक्रीत दृष्टिकोनाचा स्वीकार यासारख्या उपाययोजना केल्यास पर्यावरणाचेसंवर्धन होऊन शाश्वत आर्थिक विकास घडून येण्यास मदत होईल.

**सारांश:**

शाश्वत विकासाची तत्त्वे अंगिकारणे भारतासारख्या विकसनशील देशाला आवश्यक आहे.कारण भारताची पारंपरिक कृषीप्रधान अर्थव्यवस्था विकसित देशांप्रमाणे जलद आर्थिक विकासाचा मार्ग स्वीकारू लागली आहे. त्यातून होणारा संसाधनांचा ऱ्हास हा देशातील नैसर्गिक परिसंस्था ऱ्हास होण्यास



Scanned with OKEN Scanner

कारणीभूत ठरू शकते .यास्तव पर्यावरणाचे संरक्षण करून आर्थिक विकास साधण्यासाठी अशाश्वत विकासाकडून शाश्वत विकास साध्य करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भ:**


1. चौधरी ए पी , चौधरी अर्चना,(२०११), संपूर्ण पर्यावरणशास्त्र, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव. पृष्ठ क्रमांक २९८.
2. कदम .डी . एस ,दातीरआ. के, सानप, चिंतामणी, (२००४), विकास आणि पर्यावरणीय अर्थशास्त्र, निराली प्रकाशन ,पुणे, पृष्ठ क्र-१-३.
3. योजना ,(जाने.२०२०),संपादकीय ,माहिती व प्रसारण मंत्रालय ,भारत सरकार, अंक-६.
4. दूर शिक्षणकेंद्र,(२०१५- १६), विकासाचे अर्थशास्त्र, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक-१३.
5. https://www.dompsc.com/Envioranment/satainable-development .php
6. https://www.eviek.com/Encyc/2020/8/3/sustainable-development-goals-for-your-tommarow-amp.htmlकपिल सहस्त्रबुद्धे,Retrievals on 3 Aug 2020.17.03.11
7. आठवले आ.स,बैरागी,(२००८), पर्यावरणीय सतर्कता ,सक्सेस पब्लिकेशन, पृष्ठ क्र.२
8. www.environmentalpolushan.com
9. https://www.google.com/search?q=Karthik+ vikas
10. https://maharashtratimes.com/article/6493873
11. https://m.wikipedia.org/wiki/Shashwat